**संदर्भ-** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२१९/प्रक्र५६/आठ/ दि.२२.१२.२०२१.

२. सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांकः अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ ,मुंबई, दि. २१.९.२०१७.

३. सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र-अकंपा-१२२१/प्रक्र१८६/का-८, दि.२६.०८.२०२१

४. शासन निर्णय, वित्त विभाग, विकवि १११७/प्रक्र. १८१ विक्रीकर प्रशासन, मुंबई दि. २७.१२.२०१७.

५. या कार्यालयाचे आदेश क्र. सराआ/आस्था-६/चश्रेक/अनुकंपा नियुक्ती/कॅलेंडर वर्ष २०२२/ब-१२९, मुंबई दि. १४.०६.२०२३.

६. या कार्यालयाचे आदेश क्र. सराआ/आस्था-६/चश्रेक/अनुकंपा नियुक्ती/कॅलेंडर वर्ष २०२२/ब-२७०, मुंबई दि. २७.१०.२०२३.

७. या कार्यालयाचे आदेश क्र. सराआ/आस्था-६/चश्रेक/अनुकंपा नियुक्ती/कॅलेंडर वर्ष २०२२/ब-३४, मुंबई दि. २९.०२.२०२४

---

विशेष राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
सहायक राज्यकर आयुक्त, आस्थापना-६,
तिसरा मजला, वस्तु व सेवा कर भवन,
नवीन इमारत, माझगांव, मुंबई-१०.

**-:आदेश:-**

क्रमांकः- सराआ/आस्था.-६/चश्रेक/अनुकंपा नियुक्ती/कॅलेंडर वर्ष २०२२/२०२५/ब- 393 मुंबई, दिनांकः- 15.09.2025

पुढील आदेश निर्गमित करण्यात येईपर्यंत, मुंबई विभागातील चपराशी (कार्यसहायक) या संवर्गात अनुकंपा तत्वावर वेतन स्तर एस-१, रु.१५०००-४७६०० या वेतनसंरचनेत खालील उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे-

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचे पदनाम | वस्तू व सेवा कर विभागात नियुक्ती दिलेले कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. साक्षी जगदीश परब | चपराशी (कार्यसहायक) | नोडल ९ व लेखापरीक्षण-३, माझगांव, मुंबई |
| २ | श्री. कोगीलन आदिमुलम | हमाल (कार्यसहायक) | नोडल १३/१४, माझगांव, मुंबई |
| ३ | श्रीम. गायत्री अजय दिवेकर | चपराशी (कार्यसहायक) | नोडल १५ व लेखापरीक्षण ५, माझगांव, मुंबई |

१. चपराशी पदावरील सदर नियुक्ती ही संपूर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असून, त्यांची सेवा कोणतेही कारण न देता अगर पूर्व सूचना न देता संपुष्टात आणली जाईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

२. चपराशी पदावरील सदर नियुक्ती त्यांचे पूर्वचारित्र्य, वैद्यकीय तपासणी, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनस्त राहून करण्यात येत आहे. सदर पडताळणी संबंधित राज्यकर सहआयुक्त यांनी सदर उमेदवार राज्यकर विभागात रुजु झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत करुन घ्यावी व त्याबाबतचा अहवाल राज्यकर सहायक आयुक्त, आस्थापना-६, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयास सादर करण्यात यावा.

३. शासन निर्णय क्रमांक अंतियो १००५/१२६/सेवा-४, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१.१०.२००५ मधील परिच्छेद-ब नुसार, राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन योजना) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेले सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

४. चपराशी सेवेचे त्यागपत्र द्यावयाचे असल्यास रुजू झालेल्या उमेदवारांना त्याबाबतची एक महिना आगावू लेखी सूचना कार्यालयास देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांच्याकडून एक महिन्याचे मूळ वेतन वसूल केले जाईल.

५. राज्य शासनाकडून चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात वेळोवेळी पारित करण्यात येणारे आदेश/शासन निर्णय/शासन परिपत्रके इत्यादी, या नियुक्तीस बंधनकारक राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

६. जर उमेदवार शासन सेवेतील चपराशी या पदावरील नेमणूकीसाठी सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीप्रमाणे पात्र नव्हता अथवा विहित अर्हता प्राप्त नव्हता अथवा त्याने नेमणूक मिळण्यासाठी खोटी माहिती अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते, असे नंतर आढळून आले, तर सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.१०.१९९३ शासन निर्णय क्र.सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३ अकरा मधील तरतूदीनुसार अशा उमेदवारांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

७. सदर आदेशान्वये नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांनी विहित मुदतीत (तीस दिवसाच्या आत) स्वखर्चाने त्यांना नियुक्ती दिलेल्या कार्यालयात हजर रहावे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास सदर उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्यांचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील. तसेच उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. याबाबत नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. सेवेत रुजू होताना पडताळणीसाठी मूळ प्रमाणपत्रे समक्ष घेऊन यावीत. ही नेमणूक सदर प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून देण्यात येत आहे. तसेच उमेदवाराला सेवेत रुजू होताना त्यांच्या उत्तम चारित्र्याबद्दल दोन प्रतिष्ठीत व्यक्तींची प्रमाणपत्रे तसेच अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. राज्यकर विभागात रुजू झाल्याचा दिनांक हा त्यांच्या शासकीय सेवेतील नियुक्तीचा दिनांक समजण्यात येईल.

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

**संजय निकम**
**राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-४),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत सादर :-**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१,मुंबई
२. महालेखापाल (लेखा परिक्षण),महाराष्ट्र-१,मुंबई.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरीता :-**

१. संबंधित उमेदवार
२. स्थळप्रत.